प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शासनाच्या विविध विभागात सुसूत्रता आणि एकवाक्यता आणण्यासाठी मंत्रीमंडळाची शक्तीप्रदत्त समिती (Empowered Committee of the Cabinet) **स्थापन करण्याबाबत.....**

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रआयो.२०१७/प्र.क्र.१८०/गृनिधो-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: १५ जानेवारी, २०१८.

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि.९/१२/२०१५
२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि.३०/५/२०१७
३) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि.१३/६/२०१७
४) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१५/प्र.क्र.१२७/गृनिधो-२, दि.९/११/२०१७

<u>प्रस्तावना -</u>

केंद्र सरकारने जून २०१५ मध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे-२०२२' ची घोषणा केलेली आहे. सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सदरच्या शासन निर्णयान्वये मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती" (SLSMC) गठित करण्यात आलेली आहे. याशिवाय सदर प्रकरणी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था / अंमलबजावणी यंत्रणा यांनी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे तांत्रिक-आर्थिक मूल्यमापन करण्यासाठी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मा.अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मूल्यमापन समितीची (SLAC) पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

तसेच संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये MHADA ला अभियान संचालनालय म्हणून घोषीत करण्यात आलेले असून उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांची संचालक, राज्य अभियान संचालनालय म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तर संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये, नगरविकास विभागाच्या अधिपत्याखालील नगरपालिका प्रशासन संचालनालय (DMA) यांना MHADA व्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी (नगरपालिका / नगर पंचायती) संबंधित प्रकल्पाच्या अनुषंगाने सुकाणू अभिकरण म्हणून घोषीत करण्यात आलेले असून संचालक, नगरपालिका प्रशासन यांची राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती (SLSMC) आणि राज्यस्तरीय मूल्यमापन समितीमध्ये (SLAC) सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

राज्यातील नागरी भागात सदर योजनेचे संनियंत्रण गृहनिर्माण विभागाकडून करण्यात येत असून योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांकडून करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत राज्यातील ३८२ शहरांत या योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्याने १९.४० लक्ष घरकुलांचे उद्दिष्ट ठरविलेले आहे. सदरची योजना राज्यातील नागरी भागात ४ घटकांमध्ये राबविण्यात येत असून सदर योजनेंतर्गत राज्य शासनाकडून विविध सवलती देण्यात आलेल्या आहेत.

याशिवाय प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ स्थापना करणे, प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रकल्पांना २.५ चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे, हरीत क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यास मान्यता देणे, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना राबविणे, दिव्यांगांकरीता स्वतंत्र गृहनिर्माण धोरण राबविणे, झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियम आणि कायदयात सुधारणा, सार्वजनिक आणि खाजगी भागीदारीतून खाजगी जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याबाबत धोरण बनविणे आदी कल्पक आणि नाविन्यपूर्ण योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. या योजना राबविण्यासाठी आंतरविभागीय मान्यता आणि सहमतीची आवश्यकता असते. सदर प्रक्रिया सुलभ व्हावी म्हणून प्रकरणी सर्व संबंधित विभागांची शक्तीप्रदत्त समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

प्रस्तावनेत सविस्तर नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे शक्तीप्रदत्त समिती गठीत/स्थापन करण्यात येत आहे.

मंत्रीमंडळाची शक्तीप्रदत्त समिती (Empowered Committee of the Cabinet)

१) मा.मुख्यमंत्री	अध्यक्ष
२) मा.मंत्री (गृहनिर्माण)	सदस्य
३) मा.मंत्री (महसूल)	सदस्य
४) मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य)	सदस्य
५) मा.मंत्री (कामगार)	सदस्य
६) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण)	विशेष निमंत्रित
७) मा. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण)	सदस्य सचिव

संबंधित विभागाचे अ.मु.स./प्र.स./सचिव हे शक्तीप्रदत्त समितीच्या बैठकीस उपस्थित राहतील.

शक्तीप्रदत्त समिती प्रामुख्याने आंतरविभागीय मुद्दे ठराविक कालावधीत (साधारणत: प्रत्येक १५ दिवसांनी) बैठका घेऊन सर्व संमतीने निकाली काढेल. तसेच गृहनिर्माण धोरणाशी संबंधित योजनेला गती देऊन योजनेची अंमलबजावणी सुकर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११५१७०३०३७२०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ranjeet
Annasaheb Patil

Digitally signed by Ranjeet Annasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bf330a8fd32cb0303cd333566a693f1c1b6e21697a18d4ebe592b7edd76c8c25, serialNumber=87806c71f378b24b758ee04ca6ca7e3902af4750ed37382a14676de160fa8bf5, cn=Ranjeet Annasaheb Patil
Date: 2018.01.15 17:07:47 +05'30'

(रणजीत आ. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन, (पत्राने)
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.मंत्री (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा.मंत्री (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
७) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, म. वि. स., विधानभवन, मुंबई.
९) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, म. वि. स., मुंबई
१०) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
११) अ.मु.स./प्र.स./सचिव (महसूल/सामाजिक न्याय व विशेष सहाय्य/कामगार)
१२) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
१३) व्यवस्थापकीय संचालक,शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्वसन प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई- ५१.
१६) निवडनस्ती/गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.